MHRG190008792023

::**भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.०१/२०२१ मधील निशाणी क्र.१८ वरील आदेश** ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी मुळ अर्जदार क्र.१ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथन की, मुळ अर्जदार क्र.१ हे दिनांक २६.११.२०२० रोजी मयत झाले आहेत. मयत मुळ अर्जदार यांचे वारस मुदतीत म्हणजेच दिनांक २५.०२.२०२१ रोजीपर्यत अभिलेखावर घेणे आवश्यक होते परंतु मुळ अर्जदारांचे कायदेशीर वारस अशिक्षीत असल्याने तसेच त्यांना कायदयाचे कोणतेही ज्ञान नसल्यामुळे अर्जदार क्र.१ मयत झाल्याचे त्यांनी त्यांचे वकीलांना सांगितले नव्हते. मुळ अर्जदार यांचे वकीलांनी अर्ज सुनावणीसाठी आल्याने मुळ अर्जदारास न्यायालयात हजर राहण्याविषयी सांगण्यात आले त्यावेळी मुळ अर्जदार मयत झाल्याचे समजल्याने सदरचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज दाखल करण्यास २ वर्षे, ७ महिने आणि २४ दिवसांचा विलंब झाला आहे. सदर अर्जदार यांनी मुळ अर्जदार यांचा मृत्युच्या दाखल्याची प्रमाणित प्रत निशाणी क्र.१५ आणि प्रस्तुत अर्जाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१९ अभिलेखावर दाखल केले आहे.

३. प्रस्तुत अर्जास विरोध करताना, सामनेवाला क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.२२ व सामनेवाला क्र.३ यांनी सदर अर्जावर म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास सक्त हरकत नोंदविली आहे. अर्जास योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही तसेच

मुदतीच्या कायदयाची बाधा येत असल्याने प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदारातर्फे वकील तसेच सामनेवाला क्र.१ व २ तर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री.योगेश तेंडुलकर व सामनेवाला क्र.३ तर्फे श्रीमती वर्षा पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०५. अर्जदार यांनी दिलेला अर्ज, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी दिलेले म्हणणे याचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. मुळ अर्जदार मयत झाल्याने वारस अभिलेखावर घेण्यासाठी २ वर्षे, ७ महिने आणि २४ दिवसांचा विलंब झालेला दिसुन येत आहे. विलंब माफीचे अर्ज सहानुभुतीपुर्वक विचार करणे संयुक्तीक आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जातील दिलेली कारणे संयुक्तीक असुन अर्ज मंजुर करणे न्यायाचे होईल. असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: आदेश ::**

१. अर्जदार यांचा वारस अभिलेखावर घेण्यास झालेल्या विलंबाचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.18 17:42:19 +0530

महाड
दिनांक १८.०९.२०२५

(**श्रीमती एच.आर.जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, महाड